# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी -२२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२./२२६९०००७

तार - edutech E-mail : dte_4a@rediff.com Internet: http / www. dte.org.in


**कालमर्यादीत**

क्रमांक : ४अ/आस्था/शिरापु/२००९-१०/८०५८

दिनांक : ~~३ डिसेंबर, २००९~~ .

7 दिसम्बर DEC 2009

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपुर

२) सर्व प्राचार्य,
शासकीय/अशासकीय अनुदानित व विनाअनुदानीत
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र महाविद्यालये/
तंत्र निकेतन व तत्सम संस्था

**विषय : राज्य शिक्षक पुरस्कार २००९-२०१०**

आपणांस कळविण्यात येते की, सन २००९-२०१० वर्षासाठी तंत्रशिक्षण क्षेत्रातील शिक्षकांना राज्य शिक्षक पुरस्कार देण्याबाबत शासनास माहिती पाठवायची आहे. या संदर्भात उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांकः शिरापु १०९६/(२०४/९६)/समन्वय, दि.६.१२.१९९६ अन्वये नियम निर्धारीत केले असुन त्या शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे. सदर शासन निर्णयान्वये पुरस्कारसाठी विहीत केलेली पात्रता व निकष पुढीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. | शासन मान्य संस्थेतील शिक्षक म्हणुन सेवा किमान १५ वर्षापेक्षा जास्त असावी. |
| २. | शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या सर्व विषयांसाठी विद्यापीठ/परीक्षा मंडळ स्वायत्त संस्थेने त्या विषयाकरीता जितके तास विहीत तास विहीत केलेले आहेत तितके तास पूर्ण केले असावेत. |
| ३. | शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या सर्व विषयात हजेरीचे प्रमाण ७५ % असले पाहिजे. |
| ४. | शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या प्रत्येक विषयातील किमान ५० % विद्यार्थ्यांनी ६० % पेक्षा जास्त गुण प्राप्त केले पाहिजे. त्यातील १० % विद्यार्थ्यांनी ७५ % गुण प्राप्त केले पाहिजेत. |

| | |
|---|---|
| ५. | अलिकडील ३ वर्षात दर्जेदार पुस्तक लिहिणे,अध्ययन साहित्य तयार करणे, राज्यस्तरीय वा राष्ट्रीय पातळीवरील परिसंवादात सहभाग असणे, अध्यापनाचे कार्यात संगणकाचा वापर करणे, उजळणी वर्ग करणे तसेच संस्थेच्या सर्वागिण विकास कार्यात सहभाग असावा. |
| ६. | धारण करीत असलेल्या पदासाठी किमान आवश्यकपेक्षा जास्त असलेली अर्हता उंचावण्यासाठी प्रयत्नशील असला पाहिजे. |
| ७. | ५ वर्षाचे गोपनीय अहवाल तसेच ' परफॉर्मन्स अप्रायझल ' चे मुल्यमापन किमान २ वर्षासाठी ' अत्युत्कृष्ट ' व किमान २ वर्षासाठी 'उत्कृष्ट ' असणे आवश्यक आहे. |
| ८. | शिक्षकासंबंधी कोणतीही शिस्तभंगाची अथवा फौजदारी स्वरुपाची कार्यवाही प्रस्तावित अथवा सुरु असू नये. |
| ९. | विद्यार्थ्याच्या सर्वागीण विकासासाठी समाजाभिमुख तसेच रोजगारभिमुख करण्यासाठी ठोस प्रयत्न केलेले असावेत. |

वर नमुद केल्यानुसार राज्य शिक्षक पुरस्कारासाठी विहीत केलेली सुधारीत पात्रता व निकष सर्वदृष्टीने पुर्ण करणा-या ( ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या बाबतीत अलिकडील म्हणजेच २००४-२००५ ते २००८-२००९ या वर्षातील किमान २ वर्षाचे ' अत्युत्कृष्ट ' व किमान २ वर्षासाठी ' उत्कृष्ट ' असलेल्या ) शिक्षक संवर्गात काम करीत असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षकांसाठी जास्तीत जास्त दोन व तंत्रनिकेतनांतील शिक्षकांसाठी जास्तीत जास्त तीन शिक्षकांची माहिती प्राचार्यानी सोबतच्या विवरणपत्रामध्ये **तीन प्रतीत संबधित सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय यांचेकडे दिनांक १०.१२.२००९ पुर्वी वेगवेगळी पाठवावी.** सदर माहिती सोबत प्रत्येक निकषाच्या पृष्ठयर्थ पुरावा म्हणून आवश्यक ती कागदपत्रे / प्रमाणपत्रे, पुस्तके इत्यादी पाठवावीत.

प्राचार्य हे पद शिक्षक संवर्गातील असून शासनाने वर नमुद केलेल्या दिनांक ६.१२.१९९६ च्या शासन निर्णयान्वेय शिक्षक पुरस्कारासाठी विहीत केलेली सुधारीत पात्रता व निकष सर्वदृष्टीने पूर्ण करणा-या प्राचार्याची माहिती या कार्यालयास उपलब्ध नसल्याने त्यांनी वर नमुद केलेल्या विहीत विवरणपत्रात आवश्यक ती माहिती कागदपत्रे, प्रमाणपत्रांसह त्यांच्याशी संबंधित विभागीय कार्यालयाच्या सहसंचालकांना दिनांक **११.१२.२००९** पूर्वी पाठवावी. सदर माहिती या संचालनालयाकडे संबंधित विभागीय कार्यालयामार्फतच सादर करावी. **थेट संचालनालयास सादर केलेल्या माहिती विचार केला जाणार नाही या बाबीची कृपया नोंद घ्यावी.**

दिनांक **११.१२.२००९** पर्यत वरील सूचनांनुसार आपल्या संस्थेतील / कार्यालयातील शिक्षक पुरस्कारासाठी आवश्यक असलेली माहिती संबंधित विभागीय कार्यालयाकडे प्राप्त न झाल्यास आपल्या संस्थेतील / कार्यालयातील शिक्षक हे शिक्षक पुरस्कारासाठी विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच शिक्षक पुरस्कारास पात्र उमेदवार

नसल्यास तसे संबंधित विभागीय कार्यालयास दिनांक **११.१२.२००९** पूर्वी कळविण्यात यावे व विभागीय कार्यालयाची माहिती निरंक असल्यास त्याप्रमाणेही कळविण्यांत यावे.

उपरोक्त सुचनांनुसार सहसंचालकांच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय, अशासकीय,अनुदानित-विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तत्सम संस्थांची **माहिती दिनांक ११.१२.२००९ पूर्वी निश्चितपणे प्राप्त करुन घ्यावी.** प्राप्त झालेली माहिती त्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्यासह एकूण तीन सदस्यांच्या गठित केलल्या समिती कडुन प्राप्त झालेल्या शिफारसशींची योग्य प्रकारे व काटेकोरपणे छाननी करुन महाविद्यालयातील शिक्षक संवर्गातील २ व तंत्र निकेतनांतील शिक्षक संवर्गातील ३ शिक्षकांची शिफारस विहीत विवरणपत्रातील सविस्तर माहितीसह व प्रत्येक निकषाच्या पृष्ठयर्थ पुरावा म्हणून आवश्यक ती प्रमाणपत्रे, पुस्तके इत्यादी दोन प्रतीत तसेच **परिपूर्ण प्रस्ताव आवश्यक त्या प्रपत्रासह या कार्यालयास दिनांक २१.१२.२००९ पर्यंत** निश्चितपणे प्राप्त होईल याची दक्षता घेऊन सादर करावा. सदरची माहिती E-mail: **dte_4a@rediff.com** या ई-मेलव्दारे **ISM FONT** मध्ये तयार केलेल्या फाईलमध्ये ही पाठविण्यात यावी. विभागीय स्तरावर गठित करण्यात येणा-या समिती सदस्यांची नावे स्वतंत्रपणे कळविण्यांत येतील.

**( डॉ. सु.का.महाजन )**
**प्र.संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई**

**प्रत** : कार्यासन क्रमांक ६ मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहितीसाठी

राज्यातील तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी
महाविद्यालये यामधील शिक्षकांना राज्य
पुरस्कार देण्यासंबंधी सुधारीत नियम

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक - शिरापु १०९६/(२०४/९६) समन्वय,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ६ डिसेंबर, १९९६

**वाचा** : १) शासन निर्णय,उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक शिरापु-१०९२/(१६१)/साशि-७, दिनांक २२ ऑगस्ट,१९९५
२) संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रमांक ४अ/एपीवाय/१०९६/४७९४, दिनांक, १४.८.१९९६ व समक्रमांकित दिनांक १४.१०.१९९६ चे पत्र

**<u>शासन निर्णय</u>**

राज्यातील महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांप्रमाणे तंत्र, व्यवसाय व कला क्षेत्रातील शिक्षकांना राज्य पुरस्कार देण्याची योजना वर अ.क्र.१ येथे उल्लेखिलेल्या शासन निर्णय क्रमांक शिरापु-१०९२/(१६१)/साशि-७, दिनांक २२ ऑगस्ट, १९९५ अन्वयें लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार राज्यातील विद्यापीठांना अनुसरुन अभियांत्रिकी महाविद्यालयामधील शिक्षकांसाठी पुरस्कारांची संख्या ५ एवढी मान्य करण्यांत आली असुन तंत्रनिकेतनांच्या बाबतीत महसुल विभागनिहाय २ पुरस्कार याप्रमाणे १२ पुरस्कारांची संख्या मान्य करण्यात आली आहे. तसेच मुलींच्या शिक्षणावर भर देण्या-या एका तंत्रनिकेतनाची प्रतिवर्षी “ उत्कृष्ट महिला तंत्रनिकेतन ” म्हणून निवड करण्यासही मंजूरी देण्यात आलेली आहे. तंत्रशिक्षणाशी संबंधीत शिक्षकांची राज्य पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी जी पात्रता व निकष सदर शासन निर्णयामध्ये विहित करण्यात आलेले आहेत ते सुधारीत करण्याचा तसेच पुनर्रचना करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

१) पुरस्कार प्राप्त शिक्षक निर्विवादपणे “ उत्कृष्ट ” असावा व पुरस्कारांची संख्या मर्यादित असावी यासाठी शासन आता या निर्णयाव्दारे तंत्र शिक्षणाशी संबंधित ( अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतने ) शिक्षकांना राज्य पुरस्कार मंजूर करण्यासाठी पुढील सुधारीत नियम मंजूर करीत आहे. सदर सुधारीत नियम १९९६-९७ च्या राज्य पुरस्कारांपासुन लागू होतील.

## पुरस्काराची संख्या :-

१) राज्यातील सर्व विद्यापीठ परिक्षेत्रातील अभियांत्रिकी /वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षकांसाठी राज्य पुरस्कारांची संख्या २ एवढी राहील.

२) राज्यातील सर्व महसुल विभागांतर्गत असलेल्या अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र तंत्र निकेतनातील शिक्षकांसाठी राज्य पुरस्काराची संख्या ३ राहील.

३) ज्या शिक्षकांची प्रशासकीय पदावर पदस्थापना करण्यात आली आहे. मात्र ते मूलतः शिक्षक संवर्गातील आहेत, अशा शिक्षकांसाठी राज्य पुरस्कारांची संख्या १ असेल.

४) राज्यातील " उत्कृष्ट तंत्र निकेतन " या सदराखाली मुलींच्या तंत्रनिकेतनातील या पुरस्काराची व्याप्ती सर्वच तंत्र निकेतनांसाठी लागू असेल.

## पुरस्कारासाठी पात्रता व निकष

१) शासन मान्य संस्थेतील शिक्षक म्हणून सेवा किमान २० वर्ष असावी.
२) शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या सर्व विषयांसाठी विद्यापीठ / परीक्षा मंडळ/स्वायत्त संस्थेने त्या विषयाकरीता जितके तास विहित केले आहेत, तितके तास पूर्ण केले असावेत.
३) शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या सर्व विषयात हजेरीचे प्रमाण ७५ % असले पाहिजे.
४) शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या प्रत्येक विषयातील किमान ५० % विद्यार्थ्यांनी ६० % पेक्षा जास्त गुण प्राप्त केले पाहिजेत. त्यातील १० % विद्यार्थ्यांनी ७५ % गुण प्राप्त केले पाहिजेत.
५) अलिकडील ३ वर्षात दर्जेदार पुस्तक लिहिणे, अध्ययन साहित्य तयार करणे, राज्यस्तरीय राष्ट्रीय पातळीवरील परिससंवादात सहभाग असणे, अध्यपनाचे कार्यात संगणकाचा वापर करणे, उजळणी वर्ग करणे, तसेच संस्थेच्या सर्वांगीण विकास कार्यात सक्रीय सहभाग असावा.
६) धारण करीत असलेल्या पदासाठी किमान आवश्यकतेपेक्षा असलेली अर्हता उंचावण्यासाठी प्रयत्नशील असला पाहिजे.
७) ५ वर्षात गोपनीय अहवाल किंवा " परफॉर्मन्स ॲप्रेझलचे " मूल्यमापन किमान २ वर्षासाठी " अत्युकृष्ट " व किमान २ वर्षासाठी " उत्कृष्ट " असणे आवश्यक आहे.
८) शिक्षकासंबंधी कोणतीही शिस्तभंगाची अथवा फौजदारी स्वरुपाची कार्यवाही प्रस्तावित अथवा सुरु असू नये.
९) विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी, समाजाभिमुख, तसेच रोजगाराभिमुख करण्यासाठी ठोस प्रयत्न केले असावेत.

**<u>निवड पध्दती</u>**

१) शिक्षकाने स्वतःहुन अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

२) संस्थेचे प्राचार्य, कार्यालय प्रमुख आपल्या अधिपत्याखाली " शिक्षक " संवर्गात काम करीत असलेल्या जास्तीत जास्त २ शिक्षकांची शिफारस करु शकतील. त्यासाठी शिफारस केलेल्या व्यक्तींबाबत आवश्यक ती माहिती सादर करावी लागेल.

३) तंत्रशिक्षण विभागीय स्तरावर सहसंचालक/उपसंचालक यांचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्यिय समिती गठीत करुन प्राप्त झालेल्या शिफारशींची छाननी करण्यात येईल व महाविद्यालयातील २ व तंत्र निकेतनातील २ शिक्षकांची शिफारस करण्यात येईल.

४) संचालनालय स्तरावर संचालक, तंत्रशिक्षण यांचे अध्यक्षतेखाली ५ सदस्यिय समिती गठीत करण्यात येऊन, विभागीय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या व संचालनालयाने शिफारस केलेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येईल व समितींची शिफारस शासनास सादर करण्यात येईल.

५) शासन स्तरसवरील निवड समिती अंतिम निर्णय घेईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
( सु.द. पडवळ )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व विभागीय उपसंचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ पुणे/नाशिक/नागपुर/औरंगाबाद/ अमरावती.
संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, कला शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे/सर्व विद्यापीठोंच कुलसचिव.
महालेखापाल ( लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र मुंबई / नागपुर
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई/ सर्व जिल्हा कोषाधिकारी.
वित्त विभाग/नियोजन विभाग/खाजगी सचिव,राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, खाजगी सचिव,मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण.
स्वीय सहाय्यक,प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण.
स्वीय सहाय्यक,सहसचिव तंत्रशिक्षण
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती ( समन्वय )

**राज्य शिक्षक पुरस्कारासाठी सादर करावयाच्या माहितीचे विवरणपत्र ( तंत्र निकेतन / अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिर्माणशास्त्र )**

| अ.क्र | अध्यापकाचे नाव, पदनाम, जन्मतारीख | शैक्षणिक अर्हता | शिक्षक पदावरील एकूण सेवेचा कालावधी व संपुर्ण तपशिल<br>**गुण १०** | अध्यापकांना मागील पाच वर्षात दिलेले विषय ( दि.३१.०३.२०१०) | मागील ५ वर्षात सर्व विषयासाठी विद्यापीठ /परीक्षा/मंडळ स्वायत्त संस्थेने विहित केलेल्या तासापेक्षा अधिक तास घेतले असल्यास प्रत्येक वाढीव ५ टक्के तासासाठी **२ गुण** व जास्तीत जास्त **१० गुण** | मागील ५ वर्षात रकाना ५मध्ये विहित केलेले तास पूर्ण केले किंवा कसे तपशिल ( विषयवार ) | मागील ५ वर्षात अध्यापकांची शिकविलेल्या विषयातील हजेरीचे प्रमाण ( विषयवार )<br>**गुण १०** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |

| मागील ५ वर्षात विद्यार्थ्यांची मिळविलेल्या गुणांची टक्केवारी | | | अलिकडील ५ वर्षात दर्जेदार पुस्तक लिहिले, अध्ययन साहित्य तयार करणे<br>Research, Publication, Monographs,<br>Review - 8<br>Research - 4<br>Projects patents - 3<br>Question Paper -<br>**गुण १५** | निबंध प्रकाशन मासिकामधुन सर्वसामान्यासाठी ज्ञान व शैक्षणिक दर्जा वाढविण्याच्या दृष्टीकोनातुन लेखन तसेच महत्वाचा जबाबदा-या स्विकृत करणे त्यामध्ये कार्य करणे<br>Book Publication - 7<br>National Seminar's and Conference - 8<br>**गुण १५** | अलिकडील ५ वर्षात गोपनीय अहवालाची वर्षनिहाय प्रतवारी<br>१.२००३-२००४<br>२.२००४-२००५<br>३.२००५-२००६<br>४.२००६-२००७<br>५.२००७-२००८ |
|---|---|---|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | ६० पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची टक्केवारी<br>**१० गुण** | ७५ पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची टक्केवारी<br>**गुण १०** | | | |
| ९. | | | १०. | ११. | १२. |

| विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी समाजभिमुख करण्यासाठी केलेले ठोस प्रयत्न **गुण २०** | एकूण गुण | अभिप्राय |
|---|---|---|
| १३. | १४. | १५. |